अत्यंत महत्त्वाचे
विधानमंडळ/प्राथम्य

महापालिका आयुक्त कार्यालय,
पुणे महानगर पालिका
जा.क्र.:- मआ/डी.पी.डी.सी/सविवि-८६१
दि. १८/०६/२०२५

## कार्यालयीन परिपत्रक

विषय :- मा. महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई येथील सन २०२५ चे पावसाळी अधिवेशन संबंधित कामकाज प्राधान्याने हाताळण्याबाबत.

संदर्भ :- मा. सह सचिव महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालय/७१९७/ब-कक्ष. दि.०८/०५/२०२५.

मा. महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई येथील सन २०२५ चे पावसाळी अधिवेशन दिनांक ३० जून २०२५ पासून सुरु होणार आहे. अधिवेशनाच्या अनुषंगाने विधानसभा व विधान परिषदेमध्ये तारांकीत प्रश्न/लक्षवेधी/सूचना/अर्धातास चर्चा/कपात सूचना/अल्प सूचना प्रश्न सन्माननीय सदस्य यांच्याकडून उपस्थित होत असतात व अधिवेशन कामकाज सायंकाळी ०६.०० वा. पुढेही चालू असते. अधिवेशन कालावधीमध्ये शासनाकडून विविध संसदीय आयुधांच्या अनुषंगाने माहिती तात्काळ उपलब्ध करून द्यावी असेही वेळोवेळी कळवले जाते. सदर माहिती तातडीची व महत्त्वाची असल्याने अशी माहिती प्राधान्याने व तात्काळ उपलब्ध करून द्यावी लागते. विधानसभा/विधान परिषद नियमातील तरतुदीनुसार मागितलेली माहिती ही मुदतीत आणि विनाविलंब उपलब्ध करून देणे ही संबधित खात्याची/विभागाची जबाबदारी आहे. सबब मा. महाराष्ट्र विधानमंडळ, मुबंई येथे दिनांक ३० जून २०२५ पासून सुरु होणाऱ्या अधिवेशनाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेशित करण्यात येत आहे.

१) सर्व खाते प्रमुख यांनी विधिमंडळ कामकाजासाठी एक समन्वय अधिकारी, एक लिपिक टंकलेखक व एक शिपाई यांची नेमणूक तात्काळ करावी, व नेमणूक आदेश संबंधित अधिकाऱ्याच्या मोबाईल क्रमांक सह **समाज विकास विभाग**, जिल्हा नियोजन व विकास समिती (डी.पी.डी.सी. कक्ष) तथा समन्वय अधिकारी यांच्या कार्यालयात विशेषदूता मार्फत पाठविण्यात यावे.

२) तसेच अधिवेशन कालावधीमध्ये आपल्या खात्यामार्फत सकाळी ०८.०० ते सायंकाळी ०४.०० व सायंकाळी ०४.०० ते अधिवेशन दिवस समाप्ती पर्यंत आळीपाळीने जबाबदार अधिकारी यांची नेमणूक करून तसे आदेश काढावे.

३) सर्व खाते प्रमुख यांनी अधिवेशन कालावधी मध्ये आवक-जावक बारनिशी ही बंद न करता सूरु ठेवावी.

४) अधिवेशन कालावधीत उपरोक्त विषयाच्या संदर्भात विधिमंडळाकडून / शासनाकडून कोणताही पत्रव्यवहार झाल्यास त्याची नोंद घेऊन त्यावर तात्काळ कार्यवाही अनुसरावी.

५) तारांकीत प्रश्न/लक्षवेधी/सूचना/अर्धातास चर्चा/कपात सूचना/अल्प सूचना, प्रश्न इ. बाबत पत्र व्यवहार प्राप्त झाल्यास संबधित खात्याने उत्तराच्या मसुदा तयार करून, त्याला अतिरिक्त महापालिका आयुक्त व महापालिका आयुक्त यांची मंजुरी/स्वाक्षरी घेऊन शासनाकडे तात्काळ उत्तर पाठवण्यात यावे.

६) असे उत्तर शासनाकडे ई-मेलद्वारे/इतर माध्यमातून पाठवल्यास ते संबधित सहाय्यक कक्ष अधिकारी /कक्ष अधिकारी/अवर सचिव/उपसचिव यांना प्राप्त झाले किंवा कसे याबाबत खात्री करावी.

७) तसेच पाठवलेल्या उत्तराची एक प्रत विधिमंडळ कामकाज समन्वय कक्ष **समाज विकास विभाग**, जिल्हा नियोजन व विकास समिती (डी.पी.डी.सी. कक्ष) येथे खास दुतामार्फत जमा करावे व एक प्रत **dpdcud@gmail.com** व **sdd@punecorporation.org** या ई-मेल आयडीवर पाठवण्यात यावे.

८) अधिवेशनाच्या संबंधित एक बाब दोन अथवा त्यापेक्षा जास्त खात्याशी संबंधित असू शकते. अशा वेळी खाते प्रमुख यांनी समन्वय साधून कामकाज करावे व एकत्र उपस्थित राहून अति. महा. आयुक्त व महापालिका आयुक्त यांची स्वाक्षरी घेण्यात यावी.

९) अधिवेशनाचे संबंधित एखादी बाबीवर नक्की कोणत्या खात्याने कार्यवाही करावी असा संभ्रम अनेक वेळा तयार होतो. अशावेळी ही बाब अति. महा. आयुक्त यांचे निर्देशनास आणून दयावी व त्यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करावी, याबाबत खातेप्रमुख यांनी परस्पर निर्णय घेऊ नये.

१०) तारांकित प्रश्न/लक्षवेधी सूचना/अर्धातास चर्चा इ. बाबत अनेक वेळा विधिमंडळ मुंबई येथे वेळेवर ब्रिफिंगसाठी उपस्थित राहावे लागते अशावेळी संबंधित खाते प्रमुख यांनी विधिमंडळ मुंबई येथे वेळेवर उपस्थित राहून ब्रिफिंग देण्याची दक्षता घ्यावी. याबाबत विलंब झाल्यास संपूर्ण जबाबदारी ही खातेप्रमुख यांची राहील.

११) विधिमंडळ विषयक बाबी संदर्भात कोणतीही माहिती विचारली असल्यास संपूर्ण अभ्यास करून आणि त्यांनी तथ्याची वस्तूनिष्ठ खात्री करूनच उत्तर पाठविण्याची दक्षता घ्यावी. चुकीची माहिती /अपूर्ण माहिती/संदिग्ध स्वरुपाची माहिती उत्तरांमध्ये पाठवू नये. तसे आढळून आल्यास खाते प्रमुख हे शिस्तभंग विषयक कार्यवाहीसाठी पात्र राहतील.

१२) अधिवेशनाशी संबंधित कामकाज हे प्राधान्यक्रमाने व काळजीपूर्वक हाताळण्यास यावे याबाबत कामात कुचराई व विलंब करणारे खाते प्रमुख हे शिस्तभंग विषयक कार्यवाहीसाठी पात्र ठरतील याची नोंद घ्यावी.

(नवल किशोर राम)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रत माहितीसाठी :-

१) अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष) पुणे महानगरपालिका.

२) अतिरिक्त महापालिका आयुक्त (जनरल) पुणे महानगरपालिका.

३) अतिरिक्त महापालिका आयुक्त (इस्टेट) पुणे महानगरपालिका.

४) उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. २ तथा समन्वय अधिकारी (अधिवेशन विधिमंडळ कामकाज), पुणे महानगरपालिका.